दैनिक

# महाराष्ट्र जीत

मुख्य संपादक : सागर राणा अंभोरे    संपादक : बंडूभाऊ इंगोले

वाशीम ■ मंगळवार दिनांक 11 मार्च 2025 ■ वर्ष : 1 ले ■ अंक :294 ■ पाने : 4 किंमत : 5 रुपये Title code:- MAHMUL03935


## महत्वाचे...




### अर्थसंकल्पतील घोषणा: नागपूर विमानतळाचे श्रेणीवर्धन म्हणजे नेमके काय ?

नागपूर : राज्याची उपराजधानी आणि विदर्भाचे औद्योगिक शहर अशी ओळख असलेल्या नागपूरच्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाचे अत्याधुनिकरण आणि कार्गो हब करण्याचे गेल्या स्वप्न अनेक वर्षांपासून प्रलंबित आहे. त्यासाठी येथे दोन धावपट्टी तयार करण्याचे नियोजन आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळाचे खाजगी सहभागातून श्रेणीवर्धन आणि आधुनिकीकरण करण्यात येत आहे. □प्रवासी आणि मालवाहतूक क्षमतेत त्यामुळे वृध्दी होईल. □विदर्भाच्या सर्वांगीण आर्थिक विकासाला यामुळे चालना मिळेल, असे अर्थमंत्री अजीत पवार यांनी अर्थसंकल्पीय भाषणात स्पष्ट केले.दरम्यान, नागपूर (डॉ बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय) विमानतळ विकसित करण्यासाठी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी या विमानतळाची जमीन मिहान इंडिया लि. या कंपनीला हस्तांतरित केली आहे. विमानतळाची ७८६ हेक्टर जमीन देण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आधीच घेतला होता. मिहान क्षेत्रांतर्गत येणाऱ्या जीएमआर नागपूर आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी देण्यात येणाऱ्या ७८६. ५६ हेक्टर क्षेत्रासंदर्भात करावयाच्या कराराचा आढावा देखील घेण्यात आला. यासंदर्भातील करार करण्यात आले आहेत. जीएमआर नागपूर विमानतळ विकसित करणार आहे. यावरील याचिका सर्वोच्च न्यायालयाने निकाली काढली.

# मनोज जरांगेंचा आरोप; "मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस धनंजय मुंडे नावाच्या गुंडाला वाचवत आहेत, तो विषारी साप..."

महाराष्ट्र जीत : प्रतिनिधी



९ डिसेंबरला बीडमधल्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची अत्यंत क्रूर पद्धतीने हत्या करण्यात आली. या प्रकरणात पोलिसांनी तातडीने आरोपींना अटक केली. आवादा कंपनीच्या खंडणीच्या गुन्ह्यातून ही महाराष्ट्राची मान खाली जाणारी हत्या करण्यात आली. त्या घटनेचं क्रौर्य काय आहे ते समोर आलेल्या फोटोंवरुन समजलं आहेच. दरम्यान मनोज जरांगेंनी या प्रकरणी भाष्य केलं आहे. धनंजय मुंडेंना मुख्यमंत्री वाचवत आहेत असं मनोज जरांगे म्हणाले आहेत.

४ मार्चला धनंजय मुंडे यांचा राजीनामा

संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी जे आरोपी अटक झाले त्यातला कृष्णा आंधळे हा आरोपी फरार आहे. तर वाल्मिक कराडच्या विरोधातही गुन्हा दाखल झाला आहे. तसंच मकोकाही लावण्यात आला आहे. अर्थसंकल्पीय अधिवेशन मागच्या सोमवारी सुरु झालं. त्याच दिवशी रात्री संतोष देशमुख यांच्या हत्येचे फोटो समोर आले.

सोशल मीडियावर ते व्हायरल झाले. ज्यानंतर दुसऱ्याच दिवसी म्हणजेच ४ मार्चला धनंजय मुंडे यांना राजीनामा द्यावा लागला. वाल्मिक कराड हा धनंजय मुंडेंचा खास माणूस आहे त्यामुळे या प्रकरणाची नैतिक जबाबदारी धनंजय मुंडेंनी स्वीकारुन राजीनामा दिला पाहिजे अशी मागणी विरोधकांकडून होत होती. तो राजीनामा ४ मार्चला झाला आहे. दरम्यान मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी धनंजय मुंडे यांच्यावर कलम ३०२ लागू नये म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाला पूर्णविराम दिल्याचा आरोप केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जाणूनबुजून यांनी विषयाला पूर्णविराम दिला आहे.

तपास यंत्रणा किंवा पोलिसांना सांगून हे सगळं मिटवण्यात आलं. सीआयडी किंवा एसआयटी यांच्याकडे किंवा स्थानिक पोलिसांकडे धनंजय मुंडे त्या गुन्ह्यात असल्याचे १०० टक्के पुरावे आहेत.

## गुन्हेगारांवर 'सूक्ष्म नजर'; दहशत पसरवण्यासाठी शक्तिप्रदर्शन केल्यास...

महाराष्ट्र जीत : प्रतिनिधी




अकोला : कारागृहातून सुटलेल्या गुन्हेगारांनी पुन्हा गुन्हे करू नये म्हणून त्यांच्यावर सूक्ष्म नजर ठेवली जात असून विशेष खबरदारी घेतली जात आहे. या प्रकरणात गेल्या सव्वा वर्षात १९४ जणांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. समाजात दहशत पसरण्याच्या दृष्टीने कारागृहातून सुटलेल्या गुन्हेगारांनी शक्तिप्रदर्शन केल्यास कठोर कारवाई केली जाणार असल्याचा इशारा पोलिसांनी दिला. वाईट प्रवृत्तीमुळे अनेक लोक गुन्हेगारी कडे वळतात. चोरी, घरफोडी, जबरी चोरी, मारामारी, हत्या, फसवणूक अशा प्रकारचे गुन्हे सातत्याने समाजात घडत असतात. कायद्यानुसार गुन्हेगारांना कारागृहाची हवा देखील खावी लागते.

अनेक गुन्हे करून सुद्धा गुन्हेगारांची प्रवृत्ती बदलत नाही. दादागिरी, भाईगिरी, गुंडागर्दी करणारे काही गुन्हेगार कारागृहातून सुटल्यावर मिरवणूक काढणे, रस्त्यावर केक कापणे, असे प्रकार करतात. त्याचे रील बनवून समाजमाध्यमांतून प्रसारित केल्याचे विविध ठिकाणी आढळून आले आहे. या प्रकारावर आळा घालण्यासाठी कारगृह प्रशासन व अकोला पोलीस दलाने समन्वय ठेवुन शिक्षा भोगून कारागृहाबाहेर येणाऱ्या गुन्हेगारांवर विशेष लक्ष ठेवले जात आहे गुन्हेगारांवर लक्ष ठेवण्यासाठी सायबर सेलला विशेष 'सायबर पेट्रोलिंग'च्या सूचना पोलीस अधीक्षकांनी दिल्या आहेत. कारागृहातून गुन्हेगार सुटल्यावर त्याची तात्काळ नोंद घेऊन संबंधित पोलीस ठाण्याला माहिती दिली जाते.

# एकच फाईट राज ठाकरेनी केले, वातावरण टाईट

## कुंभामधून पाणी आणलं, हड... मी राज ठाकरे म्हणाले हड...मी पिणार नाही

महाराष्ट्र जीत : महादेव हरणे



वाशिम : - राज ठाकरे आपल्या खास शैलीसाठी प्रसिद्ध आहेत. एकाच फाईट मध्ये वातावरण टाईट करुन अनेक महत्त्वाच्या मुद्द्यांवर ते बोलतात. सहाजिकच अनेकांच्या भुवया उंचावतात. यावेळीही त्यांनी कुंभ मेळाव्या वरुन प्रश्न उपस्थित करुन महाराष्ट्राचच नव्हे तर संपूर्ण देशाच वातावरण ढवळून निघाले आहे. प्रश्न मार्मिक व महत्त्वाचे असले तरी त्यांच्या कुंभ मेळाव्या वरील व्यक्तव्याने अनेकांच्या बुडाखाली आग लागली आहे. खरे तर त्यांनी केलेले विधान सामान्य माणसाच्या डोळ्यात अंजन घालणारे आहे. महाकुंभाची जगभर चर्चा झाली. या महाकुंभा मेळ्यात कोट्यवधी लोक पोहचले. गर्दीचे आतापर्यंतचे सर्व रेकॉर्ड मोडीत निघाले. महाकुंभाविषयीचा एक किस्सा मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सांगताच एकच हश्या पिकला. महाकुंभ 2025 मध्ये पवित्र स्नानासाठी नाना सेलिब्रिटींपासून ते दिग्गज राजकारण्यांपर्यंत आणि सर्वसामान्य नागरिकांनी डुबकी मारली. महाकुंभाची जगभर चर्चा झाली. या महाकुंभा मेळ्यात कोट्यवधी लोक पोहचले. गर्दीचे आतापर्यंतचे सर्व रेकॉर्ड मोडीत निघाले. पिंपरी चिंचवडमध्ये आज महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या वर्धापन दिनाचा कार्यक्रम झाला. त्यात मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी तुफान बॅटिंग केली. महाकुंभाविषयीचा एक किस्सा मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सांगताच एकच हश्या पिकला.

### इतकी पापं करता कशाला?

राज ठाकरे यांनी एका बैठकीतील किस्सा सांगितला. त्यात काही जण बैठकीला हजर झाले नव्हते. त्यांनी याविषयी झाडाझडती घेतली होती. "मुंबईत एक बैठक लावली होती. मुंबईतील शाखा अध्यक्ष , उपाध्यक्ष हजर झाले नाहीत. त्यांची हजेरी घेतली. प्रत्येकाला विचारलं, कारणं एक एक दिली. घरचे ते आजारी, हे होतं, ते होतं. पाच सहा जणांनी सांगितलं कुंभला गेलो होतो. म्हटलं गधड्यांनो पापं करता कशाला. हेही विचारलं आल्यावर अंघोळ केली ना?" असे राज ठाकरे म्हणताच पदाधिकाऱ्यांमध्ये आज खसखस पिकली.

### म्हटलं हड....

आमचे बाळा नांदगावकर कमंडलूमधून पाणी घेऊन आले. म्हटलं हड.. मी नाही पिणार, असे राज ठाकरे म्हणताच कार्यक्रमस्थळी हस्याचा कडेलोट झाला. त्यांनी यावेळी धार्मिक अंधश्रद्धेवर चांगलाच आसूड ओढला. त्यांनी या गोष्टींबाबत समाजाचे प्रबोधन केले. राज ठाकरे यांनी धार्मिक अंधश्रद्धांवर हंटर हाणला.तेम्हणाले, "मला सांगा, पूर्वीच्या काळी ठिक होतं. आता सोशल मीडिया आला. माणसं, तिथं आलेल्या बायाबिया घासतात. आणि बाळा नांदगावकर साहेब गंगेचं पाणी. अरे कोण पेईल ते पाणी. चला आताच करोना गेला. त्याच्याशी कोणाला घेणं देणं नाही. दोन वर्ष तोंडाला फडकी बांधून फिरले. तिकडे जाऊन आंघोळ करतात. मी कित्येक स्विमिंग पुल पाहिले. आधी निळे होते. नंतर हिरवे झाले. कोण जाऊन पडेल त्यात. त्याने तिथे काही तरी केलं, ते मी इथे पितो."श्रद्धेला काही अर्थ आहे की नाही. एक नदी या देशातील स्वच्छ नाही. आणि आम्ही काय नदीला माता. परदेशातील नद्या स्वच्छ. ते काही माता म्हणत नाही. तरी नद्या स्वच्छ. आपल्याकडे पोल्युशनचं पाणी अस्वच्छ. राजीव गांधी असल्यापासून ऐकतोय गंगा साफ होणार. मध्ये राज कपूरने पिक्चर काढला. त्यात वेगळीच गंगा, असा चिमटा त्यांनी काढताचसभागृहातहास्य पिकले.

# जुन्या पेन्शनसाठी कर्मचारी पुन्हा आक्रमक; घंटानाद, काळ्या फिती लावून...

महाराष्ट्र जीत : प्रतिनिधी



अकोला : जुनी सेवानिवृत्तिवेतन योजना लागू करण्याचा मुद्दा पुन्हा एकदा समोर आला असून त्यासाठी जिल्हा परिषद कर्मचारी संघटनेने आक्रमक पवित्रा घेतला. विविध मागण्यांसाठी सोमवारी घंटानाद आंदोलनासह काळ्याफिती लावून निषेध नोंदवण्यात आला. संघटनेने विविध मागण्यांसंदर्भात प्रशासन व शासनाला निवेदन दिले आहे. १ नोव्हेंबर २००५ नंतर रुजू झालेले अधिकारी, कर्मचाऱ्यांना जुनी सेवानिवृत्तिवेतन योजना लागू न करता नवीन अंशदायी योजना लागू केली. ती रद्द करण्यासाठी शासकीय कर्मचाऱ्यांनी संपचे हत्यार उपसले. त्यानंतर शासनाने समिती गठित करून मुद्दा निकाली काढण्याचे आश्वासन दिले. मात्र, त्यावर हालचाली झाल्या नसल्याने कर्मचारी संघटनेने पुन्हा आक्रमक भूमिका घेतली.

जुनी सेवानिवृत्ती वेतन योजना लागू करण्यासह गत चौथ्या, पाचव्या वेतन आयोगातील तफावत दूर करून कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीत वाढ करण्यात यावी, पदोन्नतीस्तर कमी करून दोन टप्प्यानंतर तिसऱ्या टप्प्यावर वर्ग दोनमध्ये पदोन्नती देण्यात यावी, महाराष्ट्र विकास सेवा श्रेणी वर्ग दोनच्या नियमात सुधारणा करण्यात यावी, जिल्हा परिषद कर्मचारी आकृतीबंधामध्ये कामाचा वाढलेला व्याप लक्षात घेता सुधारणा करण्यात यावी, जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (वर्तणूक) नियम १९६७ च्या नियमात बदल करण्यात यावेत, परिचर व वाहन चालक या पदांवर भरती बंदचा आदेश शासनाने रद्द करावा व या ठिकाणी अनुकंपा तत्वावर नेमणुकीसाठी प्रतिक्षा यादीतील उमेदवारांना प्राधान्याने नेमणुका द्याव्यात, जि.प.मध्ये काम करणाऱ्या परिचर व वाहन चालक या दोन्ही संवर्गातील कर्मचाऱ्यांना नियमानुसार गणवेशासाठी रोख रक्कम व धुलाई भत्ता शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे मंजूर करण्यात याव्या आदी मागण्यांसाठी आंदोलन छेडण्यात आले होते. कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत शासनाकडे वारंवार पाठपुरावा केल्याचे जि.प. कर्मचारी संघटनेचे राज्य सहसचिव सुनील जानोरकर यांनी सांगितले. मात्र, अद्यापही मागण्या मंजूर झालेल्या नाहीत. त्यामुळे आता आंदोलन सुरु केले आहे.

पहिल्या टप्प्यात काळ्या फिती लावून व घंटानाद आंदोलन करण्यात आले. हे आंदोलन टप्प्याटप्प्याने तीव्र करण्यात येणार असल्याचा इशारा संघटनेच्यावतीने देण्यात आला आहे. आंदोलनात गिरीश मोगरे, राजेश मालगे, गजानन उघडे, अंकुश पटेल, विनोद बढे, संतोष ताथोड, दिनेश काटे, अभिजित बन्नोरे, संजय उंबरकर, रामधन सावदेकर, कैलास मसने आदींसह अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.


गाव तेथे वार्ताहर!

संपूर्ण राज्यात जिल्हा/ तालुका/ शहर व ग्रामस्तरावर

वार्ताहर/ जाहिरात प्रतिनिधी नेमणे आहे

दैनिक महाराष्ट्र जीत

संपर्क

मुख्य संपादक
सागर राणा अंभोरे
99210 45121

संपादक
बंडूभाऊ इंगोले
96044 30002


१ २ ३ ४ ५ ६

दैनिक
# महाराष्ट्र जीत
मंगळवार दिनांक 11 मार्च 2025
संपादकीय
2

## संपादकीय

# दुज्या गावचा वारा

कोचीत राहत असलो, तरी आमच्या सर्वांच्याच आधीच्या पिढीने आपली मराठी पाळेमुळे जपून ठेवण्याचा प्रयत्न कायम ठेवला. त्यासाठी अगदी पदराला खार लागला तरी चालेल अशी इथल्या बहुतेक मराठी कुटुंबांची भावना होती. त्याचं एक महत्त्वाचे उदाहरण सांगतो, ते म्हणजे विमानाने मराठी वर्तमानपत्र मागवणे. साधारण तीस चाळीस वर्षांआधी मुंबईतून येणारे पहिले विमान कोचीमध्ये साधारण सात सव्वासातच्या सुमाराला पोहोचायचे.

कोचीत असणारा एक गुजराती व्यावसायिक या विमानाने महाराष्ट्र टाइम्स, लोकसत्ता, इंडियन एक्स्प्रेस, टाइम्स ऑफ इंडिया, मुंबई समाचार अशी विविध वर्तमानपत्रे कोचीत दररोज मागवत असे. आमच्या बहुतेक जणांच्या घरी ही वर्तमानपत्रे नियमित घेतली जात. मग या वर्तमानपत्रांमधील बातम्यांचे वाचन लहानथोर करीत असत. कोचीपासून हजारो मैल दूर असलेल्या मराठी मुलखातल्या घडामोडी, तिथले राजकारण याबद्दल चवीने आमच्याकडे चर्चा व्हायच्या. वर्तमानपत्रामध्ये त्या वेळी बहुतेक वेळा मराठी पुस्तकांच्या जाहिराती येत असत. त्यावरच्या सवलती पाहून माझे वडील ती पुस्तके मागवत असत. त्यामुळे आमच्याकडे उत्तमोत्तम मराठी पुस्तके येत. आमच्या घरी अभ्यासाच्या पुस्तकांच्या वाचनाचा आग्रह असे त्याचप्रमाणे मराठी कथा, कादंबऱ्या, ऐतिहासिक माहितीपर पुस्तके, डिटेक्टिव्ह कथांची पुस्तके वाचा, असा आग्रह असे. याचा परिणाम असा झाला की आम्ही शब्दसंपन्न झालो. एरवी कोचीत राहून आम्हाला इतके मराठी समजले नसतेच. पुढे पुढे वर्तमानपत्र देणाऱ्या गुजराती माणसाला पेपर देणे जमेना, विमानसेवाही परवडेना. तेव्हा पयनको नावाचे एक मोठे प्रसिद्ध दुकान कोचीत होते. त्यांनी वर्तमानपत्रे, मराठी पुस्तके आणणे सुरू केले. पुढे मात्र, गेल्या दहा बारा वर्षांत मराठी लोकांची संख्या कमी झाल्याने वर्तमानपत्रे येणे थांबले. मात्र, ई-पेपर, न्यूज ॲप, वाहिन्यांमुळे आम्हाला मराठी मुलखातल्या बातम्या कळत आहेत. ओणम् गणेशोत्सव साधारण एकाच वेळी होतात. विशू हाही इथला मोठा सण. जसे आपले मराठी सण आमच्या जिव्हाळ्याच्या आहेत, तसे ओणम, विशूही आमच्यासाठी आमचेच सण आहेत. कित्येक मल्याळी कुटुंबीय जे आमचे स्नेही आहेत, सुहृद आहेत त्यांच्याकडे आम्ही जातो. उत्तमोत्तम जेवण, खास मल्याळी पदार्थ, खिरींचा आस्वाद आम्ही घेतो. जसा आपण दिवाळीचा फराळ त्यांना देतो, तसेच ओणमला त्यांच्याकडून आम्हाला भेटी येतात. फुलांच्या रांगोळ्यांची नयमरम्य प्रदर्शने असतात. याच दरम्यान येथील देवळांमध्ये उत्सव असतात. त्या उत्सवात जितके हत्ती येतील, तितका तो उत्सव आणि ते देवस्थान मोठे मानले जाते. लहानपणापासून या देवळात यात्रेला आम्ही जातोच जातो. टीडी टेंपल (तिरुमला देवस्थान) इथे आठ दिवसांच्या उत्सवाची धमाल असते. एर्नाकुलममध्येही उत्सव असतो. उत्सव संपायच्या दिवशी येथे मोठ्या प्रमाणात आतषबाजी असते. ही आतषबाजी इतकी सुंदर असते की डोळ्यांचे पारणे फिटते. कोचीतल्या दोन देवतांच्या देवळांतही अशी आतषबाजी होते. त्रिशूरपुरम हा उत्सव पाहणे ही तर पर्वणी असे. इथून साधारण ८० किमीवर असलेल्या त्रिशूरला आम्ही सारे उत्सवासाठी जात असू. आजही ही प्रथा आहे. माझ्या लहानपणी केरळमधील सर्व ठिकाणचे प्रसिद्ध हत्ती इथे येत. एका वेळी तीस ते पस्तीस सजवलेले हत्ती या उत्सवात असत. पण आता मात्र, प्राणी संरक्षण कायद्यामुळे विविध नियम आले आहेत आणि त्रिशूर यात्रेतील हत्तींच्या येण्यावर बंधने आली आहेत. या यात्रेतील चेंडामेळमचे वादन तर तेव्हाही आणि आत्ताही आमच्या प्रचंड आवडीचा विषय आहे. या चेंडामेळमचे वादन तासनतास ऐकणे हेही आमच्यात रुजून गेले आहे. चेंडामेळम हे मल्याळी वाद्य असले, तरी हे वाद्य इथल्या मराठी लोकांना आवडतं. उत्सव असो किंवा खाद्यसंस्कृती साधारण ७० ते ८० वर्षांत आम्ही मराठी-मल्याळी झालो आहोत. काळाच्या ओघात आमच्या पुढच्या पिढीने पोटापाण्यासाठी नवीन गावे शोधली आणि मुले दुसरीकडे गेली. जिथे तीस पस्तीस कुटुंबे नांदती होती, तिथे आता मात्र आम्ही गोखले बंधू, करंबेळकर, देव, गागळेकर अशी मोजकी कुटुंबे उरली आहेत. मुली लग्न होऊन गेल्या, कुणी शिक्षणासाठी, नोकरीसाठी तर कोणी वयोवृद्ध आता होत नाही म्हणून आपल्या मुलाबाळांकडे गेले. परिणामी गजबजलेली नांदती घरे बंद झाली आहेत. कित्येक वर्षे आधी आमच्या पूर्वजांनी पोटासाठी दाही दिशा असं म्हणत नव्या संधींच्या शोधात कोची बंदरात पाऊल ठेवले होते. कोकणातून आलेली ही कुटुंबे कोकणासारखेच वातावरण असलेल्या कोचीत सहज रमली आणि प्रगतीच्या वाटेवर गेले. आता हीच वाट आमची नवी पिढी चोखाळते आहे. त्यांच्या संधी नव्या, अपेक्षाही वेगळ्या. स्थलांतर होतच राहणार. आम्ही मात्र होता होईतो कोचीत राहणार आहोत कारण आमची मुळे आता इथलीच आहेत.कोचीतले आम्हा सर्व मराठी कुटुंबीयांचे श्रद्धास्थान हे गोपाळकृष्णाचे देऊळ हेच आहे. आम्ही सहा जण विश्वस्त म्हणून काम पाहतो. देऊळ हा आम्हा कोचीतील मराठी मंडळींचा जिव्हाळ्याचा, प्रेमाचा, आत्मीयतेचा भाग आहे. या देवळाला आत्तापर्यंत गोळवलकर गुरुजी, दत्तोपंत ठेंगडी, स्वामी गनंद (श्री रामकृष्ण परमहंस अद्वैत आश्रम), शृंगेरीचे शंकराचार्य, गोव्याच्या माजी मुख्यमंत्री शशिकाला काकोडकर, एकनाथ रानडे, शास्त्रज्ञ वसंत गोवारीकर, व्ही. एन. गाडगीळ, रवींद्र माने, शांताराम पोटदुखे, बॅ. विठ्ठलराव गाडगीळ, माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख, मारुती आबा गोळे आदी मान्यवरांनी भेट दिली आहे. देवळाचे मुख्य पुजारी आणि विश्वस्त प्रकाश सप्रे, चंद्रप्रकाश देव, रमेश करंबेळकर, महेश चिंचाळकर, मुकुंद लेले, अरविंद गोखले असे आम्ही सहा जण देवळाचे विश्वस्त आहोत. सगळे सण, उत्सव, इथले कुळधर्म, पूजा अर्चा हे सारे इथे देवळाशी जोडलेले आहेत. आमच्या नंतर या देवळाचे काय होणार, असा आमच्या समोर प्रश्न आहे. आम्हा सर्वांची पुढची पिढी आता इथे राहत नाही. त्यामुळे १४५ वर्षांच्या देवळाची कशी देखभाल करायची याचा विचार आम्ही करीत आहोत. महाराष्ट्र सरकारकडून काही मदत होईल का, याचीही चाचपणी आम्ही करीत आहोत. आमची मुले त्यांच्या मल्याळी मित्रमैत्रिणींना पोळी-भाजी, ठेपला, बटाटे पोहे, पिठलं-भाकरी, चकली, बेसन लाडू असे पदार्थ खाऊ घालतात. कोचीमध्ये महाराष्ट्रीयन पदार्थांचे स्वतंत्र असे हॉटेल नाही. पण कोचीत काही ठिकाणी पावभाजी, वडापाव मिळतो. आमची मुले त्यांच्या मल्याळी मित्रमैत्रिणींना आवर्जून या फूड जॉइंटवर घेऊन जातात. माझ्या मुलीने जेव्हा मुंबईत वडापाव, पावभाजीची चव चाखली, तेव्हा ती पटकन म्हणाली, की ही पावभाजी अगदी कोचीतल्या पावभाजीसारखीच आहे !

# एकल महिला परिषद व परिचय मेळावा संपन्न.

## कालबाह्य वाईट रुढी परंपरांना तिलांजली देऊन एकल महिलांनी प्रगती करणे काळाची गरज!!

### अकोला जिल्हाधिकारी अजित कुंभारे यांचे प्रतिपादन.

महाराष्ट्र जीत : भारत चव्हाण

सारकिन्ही,एकल महिला सन्मान चळवळ अंतर्गत एकल महिला परिषद व परिचय मेळावा महिला व बाल विकास विभाग अकोला, माणस फाउंडेशन, सेवाधर्म शिक्षण व बहुउद्देशीय संस्था अकोला,एन्करेज एज्युकेशनल फाऊंडेशन अकोला यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक महिला दिनानिमित्त एकल महिला परिषद व परिचय मेळावा जानोरकर मंगल कार्यालय, कौलखेड अकोला येथे संपन्न झालेल्या या मेळाव्याला उद्घाटनिय मार्गदर्शन करताना जुन्या वाईट चालीरीती रूढी परंपरा अंधश्रद्धा यांना तीलाजली देऊन एकल महिलांनी आपला सर्वांगीण विकास करून घेण्याची गरज आहे . कोणत्याही वाईट प्रसंगाला न घाबरता शासनाच्या विविध योजनेचा लाभ घेऊन आपला सर्वांगीण विकास करून घ्यावा त्यासाठी शासन आपल्या नेहमी पाठीशी राहील असे प्रतिपादन जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी केले. या मेळाव्यात जिल्ह्यातील एकल महिला त्यांचे प्रश्न समस्या विवंचना, सक्षमीकरण, शासन योजना, पुनर्वसन आदी विषयांवर तज्ञांनी मार्गदर्शक केले .तसेच शासनाच्या विविध योजनेची माहिती देण्यात आले. सदर मेळाव्याचे उद्घाटक मा.श्री. अजित कुंभार जिल्हाधिकारी, अकोला यांच्या शुभहस्ते करण्यात आले आहे. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षास्थानी सौ अनिता गुरव जिल्हा महिला व बाल विकास समिती अकोला यांनी भुसवले .या मेळाव्याची प्रास्ताविक. श्री दत्तात्रय श्रीरामजी लहाने, मानस फाऊंडेशन बुलढाणा यांनी केले असून या कार्यक्रमाला त्यांनी महिलांच्या समस्यांविषयी व विकासाविषयी सखोल असे मार्गदर्शन केले. प्रमुख उपस्थिती म्हणून मा.श्री. गिरीश पुसदकर जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी अकोला, श्रीमती रजिया सुलताना बुलढाणा




,मा. आरती टाकळकर सामाजिक कार्यकर्त्या एकल महिला परिषद व परिचय मेळावाला विशेष सहकार्य व मार्गदर्शन मा. श्री. नरेश मानकर ,मा. डॉ. नेहा मानकर, तुषार हांडे, मा. प्रा. शिवराम बावस्कर, मा. श्री. गजानन हरणे समाजसेवक, मा. श्री. राजू लाडूलकर (डी.सी.पी. यु.), मा. श्री. सुनील लाडूलकर, मा.. श्री. सुनिलभाऊ वनारे ,मा. श्रीमती रुपाली पांडे (जिल्हा संरक्षण अधिकारी) यांचे लाभले आहे.एकल महिला सन्मान चळवळ अंतर्गत एकल महिला परिषद (विधवा, परितक्त्या, घटस्फोटित) व परिचय मेळाव्याचे आयोजन महिलांना सक्षम बनवणे या दृष्टीने आपल्या अकोला जिल्ह्यामध्ये पहिल्यांदाच केले होत .सदर परिषदेचा मुख्य उद्देश विधवा, घटस्फोटित महिलांचा स्वाभिमान जागृत करून त्यांना सक्षम बनवण्या करता सहकार्य करणे,रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे. आत्मनिर्भर होण्याकरता समुपदेशन करणे,शासकीय योजनांची माहिती करून देणे, समाजात मूल असणाऱ्या महिलांनी पुनर्विवाह करू नये, असा समज प्रचलित आहे. तरी सामाजिक पुनः एकात्मिकरणं आणि पारिवारिक सुरक्षित आधार मिळण्याच्या दृष्टीने



पुनर्विवाह करण्यासाठी प्रोत्साहीत करणे आदी उदात्त दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून या एकल महिला परिषद व परिचय मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. या मेळाव्यात उपस्थित असलेल्या सर्व महिला पुरुषांनी शपथ घेऊन एकल महिलांचां मान सन्मान ठेवून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी काम करण्याची शपथ घेतली. यावेळी सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज सावित्रीबाई फुले, मा जिजाऊ, आदींच्या प्रतिमेचे पूजन दीपप्रज्वलन उपस्थित मान्यवर पाहुण्यांच्या शुभहस्ते करण्यात आले . या मेळाव्याला अकोला जिल्ह्यातील एकल महिलांनी उपस्थित राहून मार्गदर्शनाचा लाभ घेतला. शासनाच्या विविध योजना समजून घेतला व फॉर्म भरून घेतले. एकल महिलांच्या विकासात्मक अनेक ठराव पास करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन प्रतिभा भुतेकर, आभार प्रदर्शन नरेश मानकर यांनी केले.कार्यक्रम यशस्वी करण्याकरता तुषार हांडे, गजानन हरणे,महेंद्र गणोदे , प्रमोद धर्माळे, सुनील वानरे ,शुभांगी लावुडकर यांच्यासह विविध सामाजिक संस्था संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सामाजिक कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रम शांततेत परंतु उत्साहात पार पडला. कार्यक्रमाचा शेवट स्नेहभोजनाने करण्यात आला.

# स्त्री दर्पण विशेषांकाचे विमोचन उत्साहात संपन्न !

महाराष्ट्र जीत : प्रतिनिधी

वाशीम- जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून स्थानिक अजय बहुजन हिताय सार्वजनिक वाचनालया मध्ये स्त्री दर्पण विशेषांकाचे विमोचन उत्साहात संपन्न झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कवयित्री प्रा. सुनीता अवचार ह्या होत्या तर प्रमुख अतिथी म्हणून सेवानिवृत्त मुख्याध्यापक भास्कर गायकवाड,रेडिओ वत्सगुल्म निवेदिका ज्योती इंगळे,संध्या सभादिंडे, राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आदर्श ग्रामपंचायत अधिकारी अरविंद पडघाण, सामाजिक कार्यकर्ते राजकुमार पडघाण, मराठा सेवा संघाचे विजय शिंदे, कवी दीपक ढोले यांची उपस्थिती लाभली होती . सर्व प्रथम मान्यवरांच्या हस्ते राजमाता जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, त्यागमूर्ती माता रमाई , भारतरत्न डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांच्या




प्रतिमांना पुष्पमाला अर्पण करून अभिवादन करण्यात आले. मान्यवरांनी आपल्या मनोगतातून इतिहासातील थोर महिलांची समाजाप्रती असलेली भूमिका विशद करून त्यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. तसेच वर्तमान महिलांची प्रत्येक क्षेत्रातील योगदानाचा उल्लेख करीत त्यांच्या कडे बघण्याचा दृष्टिकोन बदलला पाहिजे असे मत व्यक्त केले . दरम्यान स्त्रियां विषयक लेखाजोखा असलेल्या अस्मिता मेश्राम,हंसिनी उचित,कविता काळे,कांचन मुन,प्रवीण बागडे,ॲड.प्रशांत शिरसाट यांनी संपादित केलेल्या स्त्री दर्पण या द्विभाषिक वार्षिक विशेषांकाचे विमोचन करण्यात आले. याप्रसंगी स्वप्निल सरकटे, माधव डोंगरदिवे ,प्रवीण पट्टेबहादूर, दुर्योधन भारसाकळे, राहुल सोमटकर, ग.ना.कांबळे, शालिक वानखेडे, डी.के.जाधव, शेळके पाटील, ज्ञानेश्वर बोडखे तशीच परिसरातील महिलांची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रभू कांबळे,आभार प्रदर्शन अरविंद उचित तर यशस्वीते साठी वाचनालयाचे संचालक समाधान अवचार यांनी प्रयत्न केले.

# मेहनत केली तरच यश मिळते जिल्हाधिकाऱ्यांचा विद्यार्थ्यांना कानमंत्र

महाराष्ट्र जीत : संजय वानखेडे

अमरावती : कोणत्याही क्षेत्रात यश मिळविण्यासाठी अभ्यास करावा लागतो, मेहनत करावी लागते. अभ्यास आणि मेहनत करण्याची तयारी असल्यास कोणत्याही क्षेत्रात हमखास यश मिळते, असा कानमंत्र जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी जिल्हाभरातून आलेल्या विद्यार्थ्यांना दिला. दिव्य सेवा सोशल सेंटरच्या वतीने राबविण्यात आलेल्या उपक्रमांत जिल्हाधिकारी आणि विद्यार्थ्यांची भेट घालून देण्यात आली. जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवनात विद्यार्थ्यांनी मनमोकळेपणाने संवाद साधला. जिल्हाधिकारी श्री. कटियार यांना अहवाल सुपूर्द करण्यात आल्यानंतर तनिष्का भोयर हिने केंद्राच्या वतीने विद्यार्थ्यांच्या विकासासाठी राबविण्यात येत असलेल्या विविध कार्याची माहिती दिली.



विद्यार्थ्यांनीही जिल्हाधिकारी कार्यालयात प्रथमच येत असल्याचे सांगितले. जिल्ह्याच्या प्रशासकीय प्रमुखावर कामाचा प्रचंड व्याप असतो. त्यांच्या समोर आपण बोलू शकणार काय, त्यांच्या समोर आपल्या भावना मांडता येतील काय, असा प्रश्नही मनात आला असल्याचे सांगितले. तसेच विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना जिल्हाधिकारी श्री. कटियार यांनी दिलखुलास उत्तरे दिली. जिल्हाधिकारी श्री. कटियार यांनी विद्यार्थ्यांना भविष्यातील ध्येयाबद्दल विचारणा केली. यावर विद्यार्थ्यांनीही अधिकारी, पायलट अशी उत्तरे दिली.

विद्यार्थ्यांनीही जिल्हाधिकारी यांना अधिकारी होण्याचे ध्येय केव्हा निश्चित केल्याचे विचारले. यावर त्यांनी महाविद्यालयीन जीवनात भारतीय प्रशासकीय सेवेत जाण्याचा विचार केल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनीही आधीपासूनच ध्येय निश्चित करावे. त्यासाठी आवश्यक असणारा अभ्यास आणि मेहनत करावी, मेहनतीमुळे कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होता येत असल्याचे सांगितले. दिव्य सेवा सोशल सेंटर विद्यार्थ्यांच्या विकासासाठी चांगले उपक्रम राबवित आहे. यामुळे बालकांच्या व्यक्तीमत्वाला निश्चितच मदत होईल. कार्यालयांना प्रत्यक्ष भेटीमुळे विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासात भर पडणार असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वासामुळे त्यांच्यात पुढे जाण्याची भावना निर्माण होणार असल्याचे सांगितले.

# योजना वेळेत पूर्ण करण्यावर भर देण्याचे आयोगाचे निर्देश

## एससी, एसटी आयोगाच्या उपाध्यक्षांकडून योजनांचा आढावा

महाराष्ट्र जीत : संजय वानखेडे

अमरावती: नाविन्यपूर्ण योजनांमधून 2019-20 मध्ये वसतिगृहामध्ये सोलार संच बसविण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला. मात्र वेळेत कामे पूर्ण झाली नसल्याने शासनावर याचा भार आला आहे. त्यामुळे सामाजिक न्याय विभागाने योजना वेळेत पूर्ण करण्यावर भर द्यावा, असे निर्देश अनूसुचित जाती जमाती आयोगाचे अध्यक्ष ॲड. धर्मपाल मेश्राम यांनी दिले. ॲड. मेश्राम यांनी सहायक आयुक्त सामाजिक न्याय विभागाच्या कार्यालयात विविध बाबींचा आढावा घेतला. यावेळी सहायक आयुक्त राजेंद्र जाधवर यांच्यासह कार्यालयातील अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. ॲड. मेश्राम यांनी आज सामाजिक न्याय विभागाच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या विविध योजनांची माहिती घेतली. प्रामुख्याने स्वाधार योजनेतील लाभापासून अद्यापही वंचित असलेल्या



7 हजार विद्यार्थ्यांच्या बाबीत तातडीने कार्यवाही करावी. त्यांना लाभ मिळण्यासाठी प्रयत्न करण्यात यावे. दादासाहेब गायकवाड सबळीकरण योजनेंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या जमिनी तातडीने वाटप करावेत. रमाई घरकुल योजनेमध्ये विविध कारणांनी दोन हजार घरे नामंजूर करण्यात आली आहेत. तसेच घरकुलांचे काम संथ गतीने सुरू असल्याबाबत ती तातडीने पूर्ण करण्यात यावे. वसतिगृहात राहणाऱ्या मुलांना स्पर्धा परिक्षांची पुस्तके देण्यासाठी प्रस्ताव पाठविण्यात आलेला नाही. त्यामुळे तो तातडीने पाठविण्यात यावा. तसेच मागासवर्गीय औद्योगिक संस्थांना भाग भांडवल वाटप करताना पहिल्या टप्प्याची यशस्वी अमंलबजावणी केली असल्याबाबत खातरजमा करण्यात यावी. त्यानंतरच दुसऱ्या टप्प्याचे भागभांडवल वाटप करण्यात यावे. यासोबतच सामाजिक न्याय विभागातर्फे राबविण्यात येणाऱ्या योजना जलद गतीने राबविण्यात याव्यात. यामुळे योजनांवरील येणारा भार कमी होण्यास मदत मिळणार असल्याचे सांगितले.

# 18 वर्षाखालील मुलींना रोजगारासाठी ठेवण्यास सक्त मनाई

## बालकामगार प्रतिबंध प्रतिज्ञापत्र मोहिमेत सहभाग नोंदविण्याचे आवाहन

महाराष्ट्र जीत : दिलीप मादाळे

नांदेड जिल्ह्यातील सर्व आस्थापना प्रमुख व इतर कर्मचाऱ्यांनी आपल्या घरी किंवा कार्यालयात तसेच कार्यालयातर्गत असणाऱ्या संस्थामध्ये 18 वर्षाखालील मुलींना घरकाम व इतर कामासाठी प्रवृत्त केले जाऊ नये, तसेच कामावर ठेवण्यात येऊ नये. याबाबत कार्यालय प्रमुखांनी खात्री करावी व तशा पध्दतीने प्रतिज्ञापत्र जिल्हा महिला बाल विकास कार्यालयास सादर करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी दिले आहेत.


बालकामगार कायदा 1986, बालकामगार प्रतिबंध आणि नियमन सुधारणा कायदा 2016 अन्वये बालकांना सर्व प्रकारच्या रोजगारात कामावर ठेवण्यास मनाई करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने 8 मार्च महिला दिनाचे औचित्य साधून नांदेड जिल्ह्यातील कोणत्याही ठिकाणी अल्पवयीन मुलीना बालकामगार म्हणून ठेवण्यात आलेले नाही. याबाबत खात्री करण्यासाठी व बालकामगार कायद्याची जनजागृती होण्यासाठी



सर्व कार्यालय प्रमुखांकडून प्रतिज्ञापत्र घेण्याचे नियोजित आहे, अशा सूचना जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी सर्व विभागा प्रमुखांना दिल्या आहेत. प्रतिज्ञापत्राचा नमुना जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय, महिला बाल विकास भवन, गणेश नगर रोड, नांदेड या कार्यालयास तात्काळ सादर करावा, असे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी आर.पी. रंगारी तसेच जिल्हा बाल संरक्षण अधिकारी विद्या आळणे यांनी केले आहे.

महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी मुद्रक आर्यन प्रिंटर्स गांधी चौक कारंजा लाड येथे मुद्रीत करून दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय, कारंजा लाड, जि. वाशिम येथे प्रकाशित केले. भ्रमणध्वनी - ९९२१०४५१२१, ९६०४४३०००२ ( सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत ) ( या आवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहील. )

१ २ ३ ४ ५ ६





# जिल्हा परिषदेचा भोंगळ कारभार! विना परवाना अवैध जागेवर शाळा बांधकाम, लाखो रुपयाचे निधीचा अपवय

## ● जिल्हा परिषद बांधकाम करताना कोणताच परवाना नसल्याचे उघड ● प्लॉट मालकाला नोटिस देऊन मालकीच्या जागेतील तार कंपाऊंड काढायचे सुलतानी फरमॉं काढल्याने प्रकरण उघड ● न्याय न मिळाल्यास उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल करणार कारंजा

महाराष्ट्र जीत : प्रतिनिधी

तालुक्यातील सर्वात मोठी जिल्हा परिषद शाळा असलेल्या कामरगाव येथील शाळेसाठी मिळालेल्या निधीतून शाळाप्र शासन आणि जिल्हा परिषदेचे बांधकाम विभागाने कृष्णानगरभाग3 मध्ये प्लॉटमालकीच्या जागेवर अवैधरित्या बांधकाम करुन शासनाच्या निधीचा अपव्यय केला असल्याचा आरोप प्लॉट मालक शरद तुमसरे यांनी केला असुन सन २०२४ रोजी जा.क्र./जि.प.वि. १ का/आस्था/१२१ जि.प. विद्यालय कामरंगाव, ता. कारंजा जि. वाशिम प्रमाणे मुख्याध्यापक जि.प.क. माध्य. विद्यालय, कामरंगाव, ता. कारंजा जि. वाशिम यांनी पत्र देवुन कृष्णा नगरमधिल सार्वजनिक उपक्रमाकरिता असलेल्या जमिनीचे तार कुंपण हटविण्याबाबत व त्यांना शिक्षण अधिकारी (प्राथ /माध्य) जिल्हा परिषद वाशिम यांचे भेटीसंदर्भात सुचना मिळाल्याचे नमुद करून तसेच गट शिक्षण अधिकारी, पंचायत समिती, कारंजा लाड व कार्यकारी अभियंता (सर्व शिक्षा अभियान, जि.प. वाशिम) यांनी वर नमुद मालकीचे शेत सर्व्हे नं. ५/१/४८ मधिल लेआऊट कृष्णा नगर भाग- ३, कामरगांव येथील शाळेच्या नविन इमारतीस भेट दिली त्यावेळी सार्वजनिक उपक्रमासाठी राखीव असलेल्या जागेवर तार कुंपण हटवुन शाळेला जाण्यासाठी असणारा मुख्य रस्ता बंद झाला असुन तेथे सुरु असलेल्या बांधकामास अडथळा निर्माण झाल्याचे नमुद केले आणि स्व मालकीच्या जागेवरील तार कंपाऊंड काढण्याचे सुलतानी फर्मान काढले आणि मालकाला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे केले त्यामुळे प्लॉट मालक शरद तुमसरे यांनी संबंधितांची तक्रार करुन न्यायाची मागणी केली आहे. सविस्तर हकिगत अशी आहे जगन्नाथ जंगलाजी तुमसरे यांचे मालकीचे शेत सर्व्हे नं. ५/१/४८ मधिल कृष्णा नगर भाग ३ हे दीनांक ३०/०५/२००७ रोजी रा.मा.क्र. एन.ए.पी. ३४/ कामरगांव/१५/२००५-०६ जगन्नाथ जंगलाजी तुमसरे यांच्या नावाने लेआऊट मंजुर होवुन त्यास कृष्णा नगर भाग ३ असे नाब देण्यात आले व नंतर सदर मालमत्तेत शरद तुमसरे रजिस्टर बक्षिसपत्रान्वये मालक झाले त्यामुळे सातच्या मालकी असलेल्या प्लॉट बाबत माहिती मिळावी यासाठी माहिती अधिकाराअंतर्गत ग्राम पंचायत कामरगांव यांना नमुद लेआऊटमधिल ॲमिनीटी स्पेसमध्ये त्यांनी बांधकाम परवानगी दिली आहे का व ॲमिनीटी प्लॉटची त्यांच्याा रेकॉर्डल नोंद आहे का याबाबत दिनांक २२/०५/२०२४ रोजी माहिती मागितली असता त्यांनी दिनांक ०१/०७/२०२४ रोजी याबाबत नकारार्थी उत्तर दिले व कोणतिही बांधकाम परवानगी नसल्याचे नमुद केले. तसेच जि.प. वाशिम यांचेतर्फेसुध्दा कोणताही पत्रव्यवहार किंवा नाहरकत मागणी केली नसल्याचे उघड झाले . लेआऊटचा मुळ मालक असतांना मालकाला याबाबत कोणतीच माहिती न देता अवैध रित्या बांधकाम केले तसेच कोणत्याही प्रकारे बांधकामासंबंधीचे आदेश जि.प. वाशिम यांनी या ॲमिनीटी स्पेसमध्ये शाळेच्या बांधकामासंबंधी दिलेली नाही. ॲमिनीटी स्पेसच्या बाजुला लागुन कोणतिही जिल्हा परिषदेची शाळा सुरु नाही व सदर बांधकाम हे जिल्हा परिषदेच्या नावाखाली होत असुन पुर्णपणे बेकायदेशीर आहे व निव्वळ जनतेच्या व कर भरणाऱ्या लोकांच्या पैश्यांचा दुरुपयोग व अपहार जिल्हा परिषदेच्या जबाबदार पदाधिकाऱ्याकडुन होत असल्याची तक्रार शरद तुमसरे यांनी केली आहे तक्रारीत नमुद मुख्याध्यापक, गटविकास अधिकारी, कार्यकारी अभियंता यांना बांधकाम परवनगीची मागणी केली, टेंडरसंबंधीची माहिती मागितली व निधी कोणत्या योजनेअंतर्गत वापरल्या जात आले याबाबत विचारणा केली असता ०७/०२/२०२५ रोजी सुनावणीकरिता हजर राहण्याचे पत्र प्राप्त आले, आणि सुनावणीस उपस्थित राहुन स्व मालकी सिद्द करण्यासाठी शरद तुमसरे मुख्य कार्यकारी यांना प्लॉट ची मालकी सिद्ध करणारी सर्व दस्तावेज दिले त्यामुळे सदर बांधकाम बेकायदेशीर घडल्याचे लक्षात आले, कारण या शाळा बांधकाम बाबत कोणताही पत्रव्यवहार कोणत्याही कार्यालयात झालेला नाही व जिल्हा परिषदेच्या निधीचा, जनतेच्या व करदात्यांच्या पैश्यांचा दुरुपयोग अपहार जिल्हा परिषदेच्या नावाखाली बिना परवानगी मालकीच्या जागेत बांधकाम करून व त्या संबंधात ग्रामपंचायतीचा कोणताही ठराव न घेता, लेआऊट मालकाची संमती न घेता अभियंता हे खोटे व बनावट दस्त तयार करून बांधकाम करित असल्याचे दिसुन येत आहे असे निदर्शनास आले त्यामुळे सदर बांधकाम हे पाडण्यात येवुन संबंधीतांवर त्यांनी शासकीय निधीचा व पदाचा गैरवापर केल्याचे प्रथमदर्शनी दिसुन येत असल्याने या प्रकरणाची गंभीररित्या दखल घेवुन १५ दिवसांच्या आत चौकशी करावी व या बेकायदेशीर कृत्यासंबंधी फौजदारी स्वरुपाचे गुन्हे दाखल करावे व असे न झाल्यास त्या लेआऊटचा मालक म्हणुन व एक करदाता म्हणुन मा. उच्च न्यायालय यांचेकडे जनहितार्थ याचिका न्याय मिळण्याकरिता दाखल करणार असल्याचे शरद तुमसरे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

# रोजगारक्षम युवा शक्तीला बळ देणारा अर्थसंकल्प : जयदीप कवाडे

## पीपल्स रिपब्लिकन पार्टी तर्फे महायुती सरकारचे अभिनंदन

महाराष्ट्र जीत : प्रतिनिधी

राज्याचे उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी सोमवारी विधानसभेमध्ये महायुती सरकारचा या वर्षासाठीचा अर्थसंकल्पात त्यांनी राज्यातील पायाभूत सुविधा व प्रकल्पांना भरीव तरतूद केली आहे. विकसित महाराष्ट्र या संकल्पनेला प्रत्यक्षात साध्य करण्यासाठी अजित पवार यांनी 'मेक इन महाराष्ट्र'द्वारे गुंतवणूकीवर भर दिला. राज्यात नवीन औद्योगिक धोरण तयार करून 5 वर्षाच्या कालावधीत 40 लाख कोटी रुपयांची गुंतवणुक तसेच यातून 50 लाख रोजगार निर्मिती लक्ष्यपूर्ती करण्याचा त्यांचा ध्यास आहे. रोजगारक्षम युवा शक्तीला बळ देणारा अर्थसंकल्प असल्याची प्रतिक्रिया पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष तसेच महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाचे उपाध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) जयदीप भाई कवाडे यांनी व्यक्त केली. प्रसिद्धी पत्रकाद्वारे जयदीप कवाडे यांनी सांगितले की, महिलांना सक्षम करणारा, उद्योग आणि कृषी क्षेत्राला उभारी देणारा, सामाजिक न्यायाला प्राधान्य देणारा, दिव्यांग व दुर्बल घटकाच्या हिताचा तसेच महाराष्ट्राच्या विकासाच्या प्रगतीपथावर नेणारा यंदाचा अर्थसंकल्प आहे. शेतकरी, कामगार तसेच दलित आदिवासी ओबीसी आणि महिला यांसह समाजातील सर्व घटकांना सक्षम करणारा, समान न्याय देणारा आणि सर्व समाज घटकांचा विचार करणारा अर्थसंकल्पा आहे. पीपल्स रिपब्लिक पार्टी आज सादर केलेल्या अर्थसंकल्पाचे स्वागत करीत असल्याचेही जयदीप कवाडे म्हणाले.



जयदीप कवाडे म्हणाले की, महाराष्ट्राला देशात एका उंचीवर नेऊन ठेवणारा हा अर्थसंकल्प आहे. अर्थसंकल्पातील केलेल्या घोषणा आणि योजना महाराष्ट्राच्या विकासाचे चक्र गतिमान करणारे आहे. गोरगरीब, शेतकरी, महिला यांना न्याय देताना उद्योग, पायाभूत सुविधांना वेग देणारा हा गेल्या सर्वोत्कृष्ट अर्थसंकल्प असल्याचे कवाडे म्हणाले. महाराष्ट्राला आर्थिक, सामाजिक औद्योगिक आणि कृषी क्षेत्राला नवसंजीवनी देणारा अर्थसंकल्प राज्याचे उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्री अजित पवार यांनी सादर केला आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या महायुती सरकार सरकार कडून जनतेला असलेल्या अपेक्षेप्रमाणे सुखद आणि समाधानकारक अर्थसंकल्प आज सादर केला आहे.

महाराष्ट्राच्या विकासासाठी दृढसंकल्प करणाऱ्या या अर्थसंकल्पात अजित पवारांच्या अर्थशस्त्राचा अभ्यास आणि दूरदृष्टीचे चमक दाखविणारा यंदाचा अर्थसंकल्प आहे, असेही जयदीप कवाडे यावेळी म्हणाले.

# आगामी होऊ घातलेल्या पंचायत समिती वर्दडी सर्कल मधून अपक्ष उमेदवार म्हणून उमेश एखंडे निवडणूक लढविण्यास उत्सुक

महाराष्ट्र जीत : प्रतिनिधी

बुलढाणा जिल्हा -* आगामी शक्यता असलेल्या जून जुलै महिन्यामध्ये होणाऱ्या जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीसाठी आत्तापासून अनेक पक्षांनी चाचणी सुरू केली असून जुन्याबरोबर नवीन चेहऱ्याला सुद्धा संधी मिळावी अशी अपेक्षा काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केली, जवळपास सर्वच राजकीय पक्ष संघटना भावी उमेदवार जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणुकीसाठी सज्ज तयार झालेले राजकीय पक्षाची संघटन सुद्धा मजबूत करणे चालू आहे अनेक जण जिल्हा परिषद पंचायत समिती साठी इच्छुक आहे सिनखेडराजा तालुक्यातील सेलू येथील युवा कार्यकर्ते उमेश एखंडे पाटील हे सुद्धा वरदडी पंचायत समिती साठी अपक्ष अर्ज दाखल करून निवडणूक लढविणार आहे उमेश अखंडे हे नेहमी सामाजिक राजकीय क्षेत्रामध्ये अग्रेसर असतात त्यांनी अनेक आंदोलने मोर्चे शेतकऱ्यांचे प्रश्न विद्यार्थ्यांचे प्रश्न गोरगरीब जनतेला न्याय देण्याचे काम केले आहे त्यांच्यासोबत युवकांची तरुण फळी तयार झालेली आहे आणि खांद्याला खांदा लावून ते काम करणार आहे उमेश शेखंडे एक तरुण चेहरा असून एक आगळी वेगळी व्यक्तिमत्व म्हणून त्यांचा परिसरामध्ये परिचय आहे जनतेने जर यासारख्या तरुणांना जर संधी दिली तर मोठी तरुणांची



फौज समस्या खंडे यांच्या पाठीमागे उभे राहिले असे चर्चा तरुणांमध्ये आहे त्यामुळे आता जनतेचे सर्व लक्ष आहे जनतेने संधी दिल्यास अनेक विकासाचे कामे सर्कलमध्ये करू असे त्यांनी म्हटले आहे

# हमी दराने माल खरेदी, शेतकऱ्यांची कर्जमाफी करा; चक्रधर गोटे यांच्या मार्गदर्शनात जिल्हाधिकारी यांना निवेदनाद्वारे मागणी

महाराष्ट्र जीत : प्रतिनिधी

वाशिम- शासनाकडून हमी दराने तुरीची खरेदी, सोयाबीनला हमी दरानुसार भाव व शेतकऱ्यांची पीक कर्जमाफी करावी. अशा मागण्या 10 मार्च रोजी जिल्हा काँग्रेस कमिटी उपाध्यक्ष चक्रधर गोटे यांच्या मार्गदर्शनात जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आल्या. यावेळी मोठ्या संख्येने शेतकरी बांधवांची उपस्थिती होती. जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले की, शासनाकडून हमी दराने तुरीची नोंदणी सुरू आहे. मात्र, अद्याप हमी दराने खरेदी प्रक्रिया सुरू झालेले नाही.

त्यामुळे हमीभाव केंद्रावरील तूर खरेदीची प्रक्रिया तातडीने सुरू करावी, सोयाबीनची हमी भावाने खरेदी बंद करण्यात आली. त्यामुळे बाजारातही सोयाबीनच्या किंमती पडल्या आहेत. ही स्थिती पाहता शेतकऱ्यांना खूप नुकसान सहन करावे लागत आहे.

त्यामुळे जिल्ह्यात हमी दराने सोयाबीन खरेदी केंद्र सुरू करावे, अथवा खुल्या बाजारतही आधारभूत किंमतीनुसार सोयाबीनची खरेदी करावी, शासनाने विधानसभा निवडणुकीत शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफीची घोषणा केली होती.

याबाबत मुख्यमंत्र्यांकडे पाठपुरावा करून, शेतकऱ्यांना धीर द्यावा. अशा मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आल्या आहेत. या निवेदनावर जिल्हा काँग्रेस कमिटी ओबीसी सेल तालुकाध्यक्ष अमोल शिंदे,विजय काळबांडे,अडगाव येथील सरपंच सुरेश हजारे, संतोष गोरे, गणेशपूर येथील माजी सरपंच बबन सावळे, जुमडा येथील सरपंच संदीप शिंदे, टो ग्रामंपाचयत सदस्य गोपाल काकडे, बालाजी काळबांडे, बळीराम वाकुडकर, विजय काळबांडे, अनिल पैठणकर, सुरेश गोटे, नारायण काळबांडे, मनोज गोरे आदि शेतकऱ्यांच्या निवेदनावर स्वाक्षऱ्या आहेत.

# जलतारा म्हणजेच शेती करता नवसंजीवनी.... तहसीलदार कुणाल झाल्टे..

महाराष्ट्र जीत : प्रतिनिधी

कारंजा.. दिनांक 07 मार्च 2025 रोजी सकाळी 9:00 वा. ग्रामपंचायत कार्यालय गायवळ परिसरामध्ये गाव समृद्धीकरिता जलतारा कार्यशाळा मा.तहसीलदार कुणाल झाल्टे यांच्या मार्गदर्शनात घेण्यात आली यावेळी मा.तहसीलदार कुणाल झाल्टे यांनी जलतारा शेती करिता नवा संजीवनी व सुख समृद्धी घेऊन येईल असे प्रतिपादन केले प्रत्येक शेतकऱ्यांनी एकरी एक जलधारा निर्माण करावा जलताऱ्याची निर्मिती करून गाव हे पाणीदार करावे या वेळी आवाहन केले मार्गदर्शनामध्ये मा. तहसीलदार कुणाल झाल्टे यांनी जलतारा निर्मिती तंत्रज्ञान विषयी गावकऱ्यांना तंत्रशुद्ध माहिती दिली तसेच राष्ट्रीय रोजगार हमी योजने अंतर्गत एकरी एक जलतारा उभारल्यास शासनाकडून अनुदान मिळणार असल्याबाबत सांगितले. तसेच ग्रामवासियांच्या प्रश्नाचे शंका निवारण केले व या वेळी गावातील सर्व लोकांनी एकरी एक जलधारा उभारण्याबाबत प्रतिज्ञा केली. गावामध्ये आता पर्यंत दहा जलतारा निर्मिती झालेली असून पुढील सात दिवसांमध्ये 500 जलताराचे काम पूर्ण होईल असे आश्वासन



कृषी सहाय्यक मंगेश सोळंके यांनी दिले ग्राम गायवळ येथे या आधी तालुकास्तरीय जलतरा निर्मिती कार्यशाळा मा. तहसीलदार कुणाल झाल्टे यांच्या मार्गदर्शनात पार पडली आहे त्याचे परिणाम तालुक्यातील बरेच शेतकऱ्यांनी जलताऱ्याची निर्मिती केलेली आहे गाव पातळीवरील जलतरा कार्यशाळे करिता मा. कार्यकारी सरपंच सतीश पाटील राऊत सह सर्व ग्रामपंचायत सदस्य ,ग्रामसेवक राठोड साहेब, जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा येथील मुख्याध्यापक येवले सर व त्यांची सहकार्य टीम तसेच शेतीनिष्ठ PDKV आयडॉल शेतकरी रवींद्र गायकवाड उपस्थित होते. कार्यशाळा यशस्वीरित्या पार पाळण्याकरिता दिनेश गायकवाड अक्षय माने, रमेश मार्गे ,अंकुश तुरक ,अरुण इंगळे व ग्रामपंचायत कर्मचारी बंडू इंगळे व श्रम योगी फाऊंडेशन गायवळ अध्यक्ष धिरज व उपाध्यक्ष परमेश्वर गोदमले व सचिव अंकुश मुंदे व त्यांचे सहकारी कर्मचारी यांनी अतोनात परिश्रम घेतले असे असल्याचे प्रतिनिधी कारंजा यांनी कळविले

# राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या महाराष्ट्र सेवादलाच्या प्रदेश महिला सचिव संघटक प्रियाताई गायकवाड यांच्यावतीने महिला दिन उत्साहात संपन्न..!

महाराष्ट्र जीत : गुरुनाथ तिरपणकर

बदलापूर- महिलांच्या अन्यायाविरुध्द आणि महिलांच्या सशक्तीकरणासाठी व सक्षमीकरणासाठी महिलांनी एकत्र येणे गरजेचे आहेत. समाजात वावरताना महिलांना येणारे प्रश्न आणि समस्या महिलांच्या संघटनानातूनच सोडवणे शक्य आहे.आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त मी माझ्या बहिणींना आई आईना सांगू इच्छिते की स्त्री शक्ती ही अमूल्य आहे,आपण सदैव सकारात्मक दृष्टीकोन ठेवून महिलांचे प्रश्न सोडवले पाहीजे असे महाराष्ट्र सेवादलाच्या प्रदेश महिला सचिव सौ.प्रियाताई गायकवाड यांनी महिलांना मार्गदर्शन करताना संबोधित केले.राष्ट्रवादी काँग्रेस




पक्षाच्या सेवादलाच्या महाराष्ट्र प्रदेश महिला संघटक प्रियाताई गायकवाड यांनी त्यांच्या कार्यकर्त्यांसह बदलापूर येथील रेल्वे आरपीएफ ऑफीस,महिला न्यूज चॅनल ऍंक्कर,सत्कर्म अनाथ आश्रम,बदलापूर पश्चिम पोलीस स्टेशन,शिवसेना उपशहर प्रमुख कार्यालय तसेच स्वतः बिझनेस करणा-या मुली अशा विविध क्षेत्रातील कार्यरत असलेल्या महिलांना भेट देऊन त्यांचा सत्कार व त्यांना महिला सशक्तीकरण कसे करावे या संदर्भात मार्गदर्शन करुन प्रोत्साहन दिले. तर या कार्यक्रमासाठी सुरेखा तळेकर, कल्पना मेरुगवार,सुकन्या संदेश गांगण,वंदना भगत या सेवा दलाच्या महिला कार्यकर्तींचे सहकार्य लाभले.

१ २ ३ ४ ५ ६

**महत्त्वाचे**

## कावळगाव येथे राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांचा जंगी स्वागत




देगलूर -देगलूर तालुक्यातील कावळगाव येथे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे नेते तथा लोहा कंधार मतदार संघाचे आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हा अध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी, माजी आमदार मोहनराव हंबर्डे, माजी आमदार अविनाशजी घाटे, राष्ट्रवादी काँग्रेस दिव्यांग सेलचे प्रदेश कार्याध्यक्ष रामदास पाटील सोमठाणकर, यांचा जंगी स्वागत करण्यात आले. यावेळी मिलिंद सोनकांबळे कावळगावकर (प्रदेश संघटक:राष्ट्रवादी काँग्रेस सामाजिक विभाग)माजी सरपंच बाळासाहेब देशमुख, माजी सरपंच मारोती शिरगिरे, युवा नेते निलेश देशमुख, संग्राम येलबुगडे, शेषराव येलबुगडे, मारोती घुळेकर, बालाजी घुळेकर,सुग्रीव फुलारी, मारोती बिरादार,सर्व गावकरी उपस्थित होते

## मंदिरांची जमीन भूमाफियांच्या घशात? मंदिर न्यास अधिवेशनात ठराव...

अमरावती : अमरावतीसह विदर्भातील अनेक सार्वजनिक मंदिर ट्रस्टच्या जमिनी काही महसूल अधिकारी, भूमाफियांच्या संगनमताने हडपण्याचे प्रकार सुरू असून या विरोधात महाराष्ट्र सरकारने 'अ‍ॅन्टी लँड ग्रॅबिंग' कायदा करावा, मंदिर सुरक्षा, मंदिर समन्वय आणि देशभरातील सरकारीकरण झालेली मंदिरे सरकारमुक्त करावी, अशी मागणी मंदिर महासंघाचे राष्ट्रीय सचिव सुनील घनवट यांनी केली आहे.

# दारव्हा शहरातील मुख्य ठिकाणी शौचालय व मुत्रीघराची व्यवस्था करा मुख्याधिकारी नगर परिषद दारव्हा यांना बहुजन मुक्ती पार्टीचे निवेदन

महाराष्ट्र जीत : प्रशांत ठाणे

दारव्हा शहरामध्ये नगर परिषदेचे मोठे कॉम्प्लेक्स आहे परंतु त्या ठिकाणी कुठेही दूर दूर पर्यंत शौचालय किंवा साधे मुत्रीघर सुद्धा नाही. नगरपरिषद कॉम्प्लेक्स मधील गाडेधारकांकडे आलेल्या ग्राहकांना अचानक शौचास अथवा मूत्रविसर्जन करण्यास कुठे जावे हा प्रश्न अनेक दिवसापासून अडचणीचा ठरत आहे परंतु नगरपरिषद प्रशासन या कडे दुर्लक्ष करीत असल्याचे दिसून येत आहे. त्याच बरोबर दारव्हा शहरामध्ये मुख्य ठिकाणी सुद्धा शौचालय व मुत्रीघर असणे गरजेचे आहे. शहरामध्ये खेड्यापाड्यातील नागरिक कार्यालयीन कामासाठी, बाजारासाठी येतात तर काही जन दवाखान्यात येतात परंतु सकाळपासूनचा घरून निघालेला व्यक्ती किती तास लघवी अथवा शौचास थांबवू शकतो? दारव्हा शहरामध्ये आठवडी बाजार,पोस्ट ऑफिस ते गोळीबार चौक, गोळीबार चौक ते बस स्टॅन्ड ते उपजिल्हारुग्णालया पर्यंत किंवा बस स्टॅन्ड ते आर्णी, दिग्रस चौफुली पर्यंत कुठीही साध्या मुतारी ची सुद्धा सोय नाही त्यामुळे नागरिक कुठेही रस्त्यावर आडोशाला जावून शौचास अथवा लघवीला बसतात.पुरुषांचे सोडा महिलांनी कुठे जायचे?शहरात ठिकठिकाणी अस्वछता निर्माण होत आहे.

आपण जर एका दिवसात बरेच दिवसाचे असलेले शहरातील



अतिक्रमण हटवू शकतात. तर आम्हाला आपल्याकडून अपेक्षा आहे की, नगर परिषद कॉम्प्लेक्स येथे येणाऱ्या ग्राहकांसाठी व शहरातील मुख्य ठिकाणी शौचालय व मुत्रीघराची त्वरित व्यवस्था करण्यात यावी.अन्यथा बहुजन मुक्ती पार्टीच्या वतीने आंदोलनाची दिशा ठरविण्यात येईल.

अशा आशयाचे निवेदन कार्यालय अधिक्षक यांच्या मार्फत मुख्याधिकारी नगर परिषद दारव्हा यांना बिमोद विठ्ठलराव मुधाने बहुजन मुक्ती पार्टी जिल्हा अध्यक्ष (पुसद विभाग) तथा प्रभारी दारव्हा दिग्रस नेर विधानसभा मतदारसंघ यांच्या नेतृत्वात देण्यात आले. तसेच यावेळी गौतम मुजमुले, प्रशांत ठाणे, निखिल सावळे, आशिष पुसांडे, पृथ्वीनंदन जाधव, दिगांबर मोहाडे, मयूर झाडे, प्रभाकर निचळे, दिगांबर महल्ले, गजानन महल्ले, परमानंद आमझरे, रमेश डगे, रमेश तायडे,नितीन भोवते, नामदेव घोडाम,परसराम चव्हाण,ज्ञानेश्वर मेश्राम, अंकुश राठोड, रवींद्र गजभिये, मोहन पाढेन, ललित धवणे, गजानन राठोड, शेख चांद शेख हुशेन, वसंता आडे, राजेश चव्हाण अशा अनेक जणांच्या सह्यानिशी निवेदन देण्यात आले..

# व्हाईस ऑफ मिडीया नांदेड जिल्हा ग्रामीण सहसचिव पदी सुभाष नाईक यांची निवड

महाराष्ट्र जीत :प्रतिनिधी

भोकर - अंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यरत असलेल्या व्हाईस ऑफ मिडीया या पत्रकार संघटनेच्या ग्रामीण जिल्हा सहसचिव पदी दै.रोकठोक प्रतिनिधी सुभाष नाईक किनीकर यांची निवड करण्यात आली तर भोकर तालुका अध्यक्ष दत्ता बोईनवाड, उपाध्यक्ष म्हणून अनिल डोईफोडे व सुरेशसिंग चौधरी यांची निवड झाल्याचे पत्र देऊन सन्मान करण्यात आले आहे.

तब्बल ४४ देशात कार्यरत असलेल्या गिनीज बुक ऑफ वर्ल्ड मधे रेकॉर्ड नोंद असलेल्या व संस्थापक अध्यक्ष भुमीपुत्र संदीप काळे असलेल्या पत्रकारांच्या हितार्थ अंतरराष्ट्रीय स्तरावर कार्यरत



व्हाईस ऑफ मिडीया या पत्रकार संघटनेच्या जिल्ह्यातील पत्रकाराची बैठक दि.९ मार्च २०२५ रोजी शासकीय विश्रामगृह नांदेड येथे संपन्न झाली. या बैठकिच्या अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष डॉ.प्रा.गणेश जोशी हे होते.तर प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा कार्याध्यक्ष बाळासाहेब पांडे,मा.ना.झेंपलवाड,व्यंकटेश जोशी,कोंडेकर, सदस्या ज्योती सरपाते मॅडम उपस्थित होते. या बैठकीत प्रथम शेतीनिष्ठ शेतकरी तथा व्हाईस ऑफ मिडीया व महाराष्ट्र शासनाकडुन सन्मान प्राप्त व्यंकटेश जोशी यांचा व्हॉइस ऑफ मिडीया संघटनेच्या वतीने शाल श्रीफळ पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच बैठकीत पत्रकारांच्या विवीध समस्यावर चर्चा करण्यात आली.यानंतर काही पदाधिकारी यांची निवड करण्यात आली.यात दैनिक विष्णूपुरीचे मुख्य संपादक मनोज बुंदिले यांची जिल्हा उपाध्यक्ष (ग्रामीण) तर दैनिक रोखठोक तथा लोकभावना न्युज पोर्टलचे संपादक सुभाष नाईक किनीकर (माली पाटील) यांची जिल्हा सह-सचिव (ग्रामीण) पदी निवड करण्यात आली. तसेच तालुका कार्यकारिणी भोकर तालुका अध्यक्ष- दत्ता बोईनवाड, उपाध्यक्ष- अनिल डोईफोडे, सुरेश सिंग चौधरी, कार्याध्यक्ष- संतोष रतनवार, सचिव- अनील कराळे,संघटक- बि.प्रकाश आदी या सर्वांना नियुक्ती पत्र देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हा अध्यक्ष गणेश जोशी, कार्याध्यक्ष बाळासाहेब पांडे,व्यंकटेश जोशी व मनोज बुंदेले यांचे मार्गदर्शन झाले अन् बैठक खेळी मेळीच्या वातावरण संपन्न झाली.

## येरवडा जेलमधील महिला बंदी साठी महिला दिन संपन्न

महाराष्ट्र जीत :गुरुनाथ तिरपणकर











पुणे- गुन्हेगार हा मुळातच गुन्हेगारी प्रवृत्तीचा नसतो,परिस्थिती त्या व्यक्तीला गुन्हेगार बनवते मग पुरुष असो वा स्त्री.जेलमध्ये प्रवेश केल्यानंतर जेल प्रशासन त्यांच्यावर त्यांच्यातील गुन्हेगारी प्रवृत्ती जाण्यासाठी वेगवेगळ्या समुपदेशन कार्यक्रम घेऊन सकारात्मक बदल घडवुन आणण्याचा प्रयत्न करते. त्याचाच एक भाग म्हणून पुण्यातील येरवडा जेलमधील महिला बंदी साठी महिला दिना निमित्त आगळा वेगळा कार्यक्रम जेल मध्ये आयोजित करण्यात आला होता.गोल्डन लेटर्स बाल फाऊंडेशनच्या अध्यक्षा डॉ.राणी खेडीकर यांनी कार्यक्रमास सुरुवात केली. या कार्यक्रमास प्रज्ञा दीप सोशल फाऊंडेशनचेही सहकार्य लाभले.प्रज्ञा दीप फाऊंडेशनकडुन वैशाली गायकवाड आणि प्रज्ञा रोकडे उपस्थित होत्या.यावेळी महिला बंदीचे समुपदेशन करण्यात आले.येरवडा जेल महिला बंदी साठी हा कार्यक्रम संस्कार भारती यांनी अतिशय सुंदर अर्थपूर्ण पद्धतीने सादर केला. जिजाऊ,सावित्रीबाई फुले यांसारख्या कर्तृत्ववान स्त्रियांची गाथा पोवाड्यातून सर्व महिला कलाकारांनी सादर केली.कार्यक्रमाला मा.तुरुंग अधिकारी सुनिल ढमाल सर आणि अतिरिक्त निरीक्षक मा.पल्लवी कदम मॅडम प्रामुख्याने उपस्थित होते.एडवोकेट. अनिषा फणसाळकर यांनी महिलांचे मानसिक आरोग्य यावर मार्गदर्शन केले.ढमाले सरांनी उत्तम मार्गदर्शन केले आणि सर्व महिला बंदीना महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या.कदम मॅडम यांनी कार्यक्रमाची सांगता केली.

# भारतरत्न डॉ .बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय पुरस्काराने येरगी चे सरपंच संतोष पाटील सन्मानित

महाराष्ट्र जीत : संघपाल मदने

देगलूर - देगलूर तालुक्यातील चालुक्य कालीन नगरी येरगी गावचे सरपंच संतोष पाटील यांना केंद्र सरकारकडून देण्यात येणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना भारतभूषण उत्कृष्ट ग्राम संसद सरपंच २०२५ हा पुरस्कार जाहीर झाला , रविवारी ९ मार्च रोजी दिल्ली येथे एका कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. रविवारी दिल्ली येथील महाराष्ट्र सदन मधील भव्य सभागृहात सदरील कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सरपंच संतोष पाटील यांनी




आपल्या गावात केलेल्या उल्लेखनीय कार्याची तसेच विविध विकास कामांची दखल घेऊन दि.९ मार्च रोजी नवी दिल्ली येथे केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांच्या हस्ते या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले,यावेळी लोकसभा खासदार बळवंत वानखडे,माजी राज्यपाल कमलताई गवई आदी उपस्थित होते. नवी दिल्ली येथे प्रजासत्ताक दिनाच्या परेडमध्ये अतिथी म्हणून तालुक्यातील येरगी गावचे सरपंच संतोष पाटील यांना निमंत्रित करण्यात आले होते. सर्वसामान्य शेतकरी कुटुंबांमधील सरपंच संतोष पाटील यांनी विविध उपक्रम राबवत आदर्श व उपक्रमशील ग्रामपंचायत बनवली आहे. त्यांच्या संकल्पनेतून गावातील पुढची पिढी सजग, सक्षम,निर्व्यसनी निरोगी व सज्ञान बनवण्याच्या दृष्टीने तसेच बालिका पंचायत राज व इतर मुली,युवतींना स्वसंरक्षणाचे धडे देत त्यांना आत्मनिर्भर होण्यासाठी केलेले प्रयत्न,गावात स्वच्छता अबाधित राहण्यासाठी आजतागायत चालू असलेले कार्य,गावाला स्मार्ट व्हिलेज बनवण्यासाठी चे कार्य अशा विभिन्न कार्यामुळे संतोष पाटील यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. संतोष पाटील यांना हा पुरस्कार मिळाल्यामुळे नांदेड जिल्ह्यातील देगलूर तालुक्यातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यावर सुरक्षा छत्री बसवण्याची सामाजिक कार्यकर्ते गणेश वराडे यांची राज्य शासनाकडे मागणी

महाराष्ट्र जीत : प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाच्या तसेच ठाणे महानगरपालिका प्रशासनाच्या माध्यमातून ठाणे रेल्वे स्थानकाच्या समोरील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर उड्डाणपूल परिसरात भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा बसविण्यात आला आहे. पुतळ्यावर विविध पक्षी बसून विष्टा करित असल्याने पुतळ्याची एक प्रकारे विटंबनाच होत आहे. त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यावर लवकरात लवकर संरक्षक छत्री बसवावी अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते गणेश वराडे यांनी केली आहे. वराडे यांच्या लक्षात येताच ठाण्यातील प्रशासनाच्या माध्यमातून बसविण्यात आलेल्या पूर्णाकृती पुतळ्यावर सुरक्षा



छत्री बसविण्याची लेखी मागणी राज्य शासनाच्या मंत्रालयातील नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवांकडे तसेच ठाणे महानगरपालिकेच्या आयुक्तांकडे केली आहे. त्यामुळे आतातरी शासनाकडे आणि प्रशासनाकडे करण्यात आलेल्या मागणीची दखल घेऊन भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यावर सुरक्षा छत्री बसविणार का ? याकडे सर्वांचे लक्ष वेधले आहे.




# जागतिक महिला दिनानिमित्त आणि सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतीदिनानिमित्त अमरावती येथे एक दिवशीय करिअर मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न..

## उघड्या डोळ्याने पाहिलेले स्वप्न हे आयुष्यामध्ये उतरावे:- डॉ.हर्षवर्धन देशमुख



महाराष्ट्र जीत : प्रतिनिधी

अमरावती:- अनुभव शिक्षा केंद्र अमरावती/वाशिम अंतर्गत दि.०९/०३/२०२५ रोजी जागतिक महिला दिनानिमित्त आणि सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त एक दिवशीय कार्यशाळा शासकीय विश्रामगृह अमरावती येथे आयोजित करण्यात आली होती.या कार्यशाळेचे विषय करिअर मार्गदर्शन आणि युवक कार्यशाळेचे उद्घाटन मा.सुरेश लुले (अ.भ.शि - विभागीय समन्वयक) कार्यशाळेचे अध्यक्ष प्रा.शिवाजी तुप्पेकर (अनुभव साथी) आणि कार्यशाळेमध्ये मार्गदर्शक डॉ.हर्षवर्धन देशमुख (डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला) यांची उपस्थित होती.कार्यशाळामध्ये प्रमुख उपस्थिती मा.भाई प्रफुल कुकडे, प्रा.ज्योत्सना मेहकरे,आशिष धोंगडे,प्रतीक पवार (अनुभव साथी) यांची कार्यशाळेमध्ये उपस्थिती होती.या कार्यशाळेमध्ये जागतिक महिला दिनानिमित्त अनुभव शिक्षा केंद्र लेक लाडकी-२०२५ पुरस्कार या पुरस्काराचे मानकरी अमरावती येथील कु.वैष्णवी नरेंद्र कडू यांना त्यांच्या आई-वडिलांसहित पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं.अनुभव शिक्षा केंद्र लेक लाडकी पुरस्काराचे दुसरे वर्ष असून अमरावती आणि वाशिम जिल्ह्यातील युवकांसोबत सुरू केलेला पुरस्कार आहे. उत्कृष्ट युवा मित्र पुरस्कार-२०२५ या पुरस्काराचे मानकरी वाशिम येथील प्रदिप कडूजी पट्टेबहादुर यांना त्यांच्या आई-वडिलांसहित पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.अनुभव शिक्षा केंद्र,उत्कृष्ट युवा मित्र पुरस्कार, हा यावर्षी पासून अमरावती आणि वाशिम जिल्ह्यातील युवकांसोबत प्रथमता सुरू करण्यात आला.हे दोन्ही पुरस्कार गेल्या ३ वर्षापासून अनुभव शिक्षा केंद्र या प्रक्रियेमध्ये सातत्याने मूल्य आधारित नेतृत्व गुण विकसित होऊन आणि मूल्य अंगीकृत करणाऱ्या युवकांना या पुरस्काराने सन्मानित करण्यात येईल.या कार्यशाळेमध्ये मा.भाई प्रफुल कुकडे यांनी अनुभव शिक्षा केंद्राच्या प्रक्रियेमधून आम्ही कशाप्रकारे घडलो याबाबत युवकांना मनसोक्तपणे मार्गदर्शन केले. कार्यशाळेमध्ये करिअर गायडन्स या विषयावर युवकांना मार्गदर्शन करण्यात आले. स्वप्न,निर्णय, रिक्स करियर निवडताना आपण आपली आवड लक्षात घेतल्यानंतर सगळयात महत्वाचा भाग म्हणजे आपण स्वतःला कुठे पाहतो. आपण घेतलेला निर्णय हा शाश्वत असावा खाली निर्णयापर्यंत पोहोच जिद्दही सतत आचारात आणि विचारात आणावी. कारण करियर निवडायचे असेल तर आपल्यापुढे एक लक्ष्य असायला हवे की पुढच्या पाच ते दहा वर्षात मला कोणत्या विशिष्ट ठिकाणी पोहोचायचे आहे. ते मग ते कोणतेही पद असेल,उपाधी असेल किंवा आर्थिक वृद्धी असेल.त्याचा विचार करुनच करियर निवडावे जेणेकरून तिथे पोहोचणे सोपे होते.विविध शिक्षणाच्या माध्यमातून अनेक संधी उपलब्ध आहेत.अनेक संस्था कंपन्या प्रोजेक्ट वरती कार्या व्यवसाय करू शकतो.त्या साठी मिळालेल्या संधीचं सोन करुन प्रत्येकाने निवडलेल्या क्षेत्रामध्ये आपण उच्च प्राविण्य मिळवून त्या क्षेत्रामध्ये आदर्श व्यक्ती घटनेचा मानस देवावा असे आवाहन डॉ. हर्षवर्धन देशमुख यांनी आपल्या मार्गदर्शनातून केले.कार्यशाळेची उद्घाटक सुरेश लुले यांनी अनुभवी शिक्षा केंद्र या प्रक्रिये बाबत युवकांना कशाप्रकारे नेतृत्व गुण विकसित केल्या जाते आणि ही प्रक्रिया युवकांसाठी किती महत्त्वपूर्ण आहे या संदर्भमध्ये युवकांना मार्गदर्शन करण्यात आले अशा प्रकारे ही एक दिवशीय कार्यशाळा अमरावती येथील शासकीय विश्रामगृह येथे संपन्न झाली. या कार्यशाळेला याशवी करिता प्रतिक म्हणून पवार,प्रदिप पट्टेबहादुर, वेदांत कोल्हे, संजोग सूर्यवंशी, सचिन भगत, वैष्णवी कडू, गौरी घुरडे, आकांक्षा गायकवाड,गौरी टेकाम,आकांक्षा कांबळे,वैष्णवी खंदारे,यांच्या सह अनेकांनी परिश्रम घेतले.

**युवक युवती यांच्या कलागुणांना वाव व सामाजिक आर्थिक शैक्षणिक व व्यवसायिक नेतृत्व विकास घडविण्यासाठी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या युवक युवती यांच्या कार्यशाकेमध्ये लेक लाडकी-२०२५ पुरस्काराने कु.वैष्णवी नरेंद्र कडू आणि उत्कृष्ट युवा मित्र पुरस्काराने प्रदिप कडूजी पट्टेबहादूर यांना उपस्थित मान्यवराच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.**